पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक २३/०३/२०२१

| पो.स्टे /अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटनाता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचेनाव |
|---|---|---|
| गडचिरोली अप.क्र. १६४/२०२१कलम ६५(फ),६९,८३ महा.दारुबंदी अधिनियम | मौजा चांदाळा टोली **घटनाता. वेळ** :-दि.२२/०३/२०२१चे १५:०० ते १६:३० वा.पर्यंत | फिर्यादी सरकारतर्फेपोहवा/१८५० निलकंठ सुकरु पेन्दामनेम.स्थानिक गुन्हे शाखा, पोलीसअधिक्षककार्यालय,गडचिरोली **आरोपीतांचेनाव** :- १)विलास हरीदास उसेंडी वय ३० वर्ष २) सौ. सुभांगी विलास उसेंडी वय २६ वर्ष३) रुंदा अनिल वड्डे वय ३० वर्ष ४) **पाहीजे आरोपी** नामे रमेश छगन गोरे सर्व रा . चांदाळा टोली ता.जि. गडचिरोली |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवैधदारु मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** | |
| गोपनिय बातमीदाराकडुन मिळालेल्या माहिती वरुन | स.फौ./७८७ दादाजी करकाडे पोहवा/१८५० निलकंठ पेन्दाम, नापोशि/२३९१ शुक्रचारू गवई, पोशि/५३५४ सुनिल पुङ्गावार, पोशि/३४६७ मंगेश राउुत, मनापोशि/२३६१ पुष्पा कन्नाके, चानापोशि/२५४१ शेषराज नैताम | |

गडचिरोली जिल्हयातील अवैधदारुविक्री तसेच बेकायदेशीर दारु वाहतुकीस आळा बसावा या करीता मा.श्री. अंकित गोयल, पोलीस अधिक्षक गडचिरोली, मा.श्री. समीर शेख अपर पोलीस अधिक्षक(प्रशासन)यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु–जुगार व ईतर अवैध व्यवसायांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशीर कार्यवाही करण्याची तसेच दि. २०/०१/२०२१ रोजी पारपडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकी दरम्यान मौजा लक्ष्मपुर गावातील लोकांनी विषारी दारु प्राशन केल्याने दोन ईसम मृत्यु पावले व आठ ईसमांना विषबाधा होवुन आजारी पडल्याने हातभट्टी गुळा मोहाची दारु गाळुन विक्री करणाऱ्यावर कडक व प्रभावी कार्यवाही करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी पार पाडत असतांना दिनांक २२/०३/२०२१ रोजी कार्यालयात हजर असतांना मुखबीरद्वारे खबर मिळाली कि, मौजा चांदाळा टोली येथील नामे रमेश गोरे व त्याचे तिन साथीदास असे मिळुन चांदाळा टोली गावातील गोमाजी उसेंडी याचे शेताजवळील वाहीचे किनाऱ्यावर हातभट्टी लावुन मोहाची दारु गाळुन ठोक विक्री करतो. अशा खबरे वरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी सा. गडचिरोली यांना माहीती देवुन यांचे मार्गदर्शनाखाली व आदेशान्वयेस्थानिक गुन्हे शाखेतील वरीलनमुद पोलीस पथक हे किट साहीत्य, शासकिय लॅपटॉप व प्रिंटर सोबत घेवुन शासकिय वाहन क्रमांक एम.एच. ३३ सी -०३८५ ने गडचिरोली येथुन रवाना होवुन गांधी चौक गडचिरोली येथे पोहचुन तिथे घटनास्थळ पंचनाम्यातील नमुद दोन पंचांना बोलावुन प्रोव्ही रेड बाबतखबरदेवुनत्यांना सोबत घेवुन पो. स्टॉफ व पंच असेअवैधदारु रेड कारवाई करीता मिळालेल्या माहीतीचे आधारे मौजा चांदाळा टोली गावातील गोमाजी उसेंडी याचे शेताजवळील वाहीचे किनाऱ्यावर लपत-छपतगेलो असता शेताचे बाजुच्या वाहीचे किनाऱ्यावर धुर निघत असल्याचे दिसुन आले. आम्ही लपत-छपत धुर निघत असलेल्या दिशेने गेलो असता दोन ईसम व दोन महीला चुल पेटवुन त्यावर दोन मोठे जर्मनी केटली मांडुन मोहादारु गाळीत असल्याचे दिसले आम्ही त्याचे जवळ जाताच आमची त्याला चाहुल लागताच आम्हाला पावुन त्यापैकी एक इसम पळुन गेला. व घटना स्थळावर एक पुरुष व दोन महीला मिळुन आल्या मिळुन आलेल्या ईसमाला व मह्लांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नामे१)विलास हरीदास उसेंडी वय ३० वर्ष २) सौ. सुभांगी विलास उसेंडी वय २६ वर्ष ३ ) रुंदा अनिल वड्डे वय ३० वर्ष असे सांगीतले त्यांना पळुन गेलेल्या ईसमा बाबत विचार पुस केली असता सदर ईसम हा त्यांचा मालक रमेश छगन गोरे रा. चांदाळा टोली ता.जि.गडचिरोली असे सांगीतले.

घटनास्थळाची पाहणी केली असता १)१०० लिटरक्षमतेच्या निळया रंगाच्या प्लॉस्टीक २६ नगड्रॅम मध्येदारु गाळण्याकरीता टाकलेला २६०० लिटर गुळा-माहाचा सळवा किंमत २,६०,०००/- रुपये ,२) २० लिटरक्षमतेच्या पांढऱ्या रंगाचे प्लॉस्टीक ३ कॅनमध्ये ६० लिटर हातभट्टी मोहाची दारु अवैधविक्रीकिंमत २०० /- रुपये प्रति लिटर प्रमाणे १२,०००/- रुपये ३) ५ पोत्यामध्ये १७५ किलो मोहा फुल किंमत १७,५००/- रुपये व ४) ४ जर्मन मोठया केतल्या किंमत २,०००/- रुपये असा एकुन २,९१,५००/- किंमतीचा अवैध मुद्देमाल मिळुन आल्यानेगुन्हयातील आरोपीविरुध्द पोलीस स्टेशनगडचिरोली येथे वरीलनमुदकलमान्वये गुन्हा नोंदकरण्यात आला आहे.

